आरोग्य सेवा

आरोग्य सेवा संचालनालय
पुणे कार्यालय, पुणे ४११ ००१.

आ.क्र. कर्मचारी/आरोग्य कर्मचारी/कायम प्रवासभत्ता/
दिनांक: ६ मार्च, १९९६. कक्ष-१७

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, [सर्व]

विषय : कायम प्रवासभत्ता फिरतीचे दिवस निश्चित करणेबाबत.

संदर्भ : १] महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींची मा. राज्यमंत्री [सार्वजनिक आरोग्य] यांचेशी दि. १६.१०.९५ रोजीची चर्चा.

२] महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, निर्णय क्र. अेएसओ/१०९०/१४९१/६८/९०/सेवा-८, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक १९.१.१९९५.

उपरोक्त संदर्भित क्र. २ च्या दि. १९ जानेवारी, १९९५ च्या आधारे आरोग्य सेवा विभागातील फिरतीचे काम करणा-या कर्मचा-यांना परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून कायम प्रवासभत्ता दि. १.१.१९९५ पासून लागू केला. परिच्छेद ३ मधील मुद्दा क्र. १ मध्ये त्यांना नेमुन दिलेल्या फिरतीच्या दिवसाइतकी फिरती प्रत्येक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे. यासंबंधी पुढील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१] आरोग्य सेवक/सेविका- या संवर्गाचे कार्यक्षेत्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्र निश्चित केले असून आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने आकस्मिक प्रसंगी उदा. साथीचा उद्रेक, महाराष्ट्रीय आरोग्य सेवेचे सर्वेक्षण, लसीकरण, कुटुंब कल्याण मोहिम आदी महत्वाच्या आरोग्य सेवा कार्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्रात त्यांना काम करावे लागते. आरोग्य सेवक/सेविका यांचे १८ दिवस प्रत्येक महिन्यात फिरतीचे निश्चित केले आहेत. यांचे कार्यक्षेत्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राचे असल्याने ८ किलोमिटरचा प्रश्न येत नाही. कार्यक्षेत्रात,

१२ दिवस गृहभेटी, गरोदर मातांना सेवा देणे, आरोग्य शिक्षण देणे/ प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादी. दररोज २५ कुटुंबाना भेटी देणे.
३ दिवस लसीकरण सत्र आयोजन, चर्चा इत्यादी.
३ दिवस प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी, आठवडा मिटींग, शस्त्रक्रिया शिबीरे.

शस्त्रक्रिया शिबीरास औषधे/साधनसामग्री पुरवठा इत्यादी कामासाठी असे एकूण १८ दिवस प्राथमिक आरोग्य केंद्राचे कार्यक्षेत्रात फिरतीचे दिवस निश्चित केले आहेत.

[२/...]

२] आरोग्य सहाय्यक [महिला/पुरुष] यांचे तालुका कार्यक्षेत्र असून १५ दिवस फिरतीचे दिवस निश्चित केले आहेत.

६ ते ८ दिवस लसीकरण सत्र आयोजन.
२ दिवस उपकेंद्र भेट/रेकॉर्ड तपासणी/ मार्गदर्शन.
१ दिवस क्लिनिक आयोजन/पाणी शुध्दीकरण कार्य पहाणी, साथनियंत्रण.
३ दिवस सहा राष्ट्रीय आरोग्य सेवेतील लाभार्थींना भेटी/इतर आवश्यक कामे व या संबंधी मिटींग घेणे.

एकूण १५ दिवस फिरती निश्चित व पुरुषांसाठी ५ दिवस मुख्यालयाबाहेर मुक्काम निश्चित केले आहेत.

३] आरोग्य पर्यवेक्षक / विस्तार अधिकारी.

तालुका कार्यक्षेत्र – फिरतीचे दिवस १५, मुक्काम ५ दिवस.

२ दिवस लसीकरण सत्र अवलोकन व मार्गदर्शन.
२ दिवस उपकेंद्र रेकॉर्ड तपासणी व मार्गदर्शन.
२ दिवस प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यपहाणी शिबीर आयोजन.
५ दिवस ग्रामीण भागात भेटी, पाणी शुध्दीकरण कार्यपहाणी / लाभार्थींना भेटी.
२ दिवस प्राथमिक आरोग्य केंद्र – मासिक मिटींग.
२ दिवस जिल्हा आरोग्य कार्यालय मिटींग/अहवाल सादर करणे इत्यादी.

४] जिल्हा स्तरीय पर्यवेक्षक

आरोग्य पर्यवेक्षक/विस्तार अधिकारी/जिल्हा स्वास्थ्य परिचारिका/ अवैद्यक पर्यवेक्षक/आरोग्य सहाय्यक स्त्री/पुरुष

यांचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा असून, त्यांचे फिरतीचे दिवस निश्चित करतांना जिल्हा पातळीवरुन करावयाचे अहवाल., त्याआधारे संनियंत्रण व मार्गदर्शन, वेगवेगळ्या मिटींगची पूर्व तयारी व सहा राष्ट्रीय आरोग्य सेवेच्या कार्याचे अवलोकन करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन व त्यांना जिल्हा स्तरावरुन करावयाची कामे व फिरतीचे क्षेत्र विचारात घेता त्यांना १२ दिवस फिरती निश्चित केली आहे.

२ दिवस तालुका आरोग्य कर्मचारी-सभा आयोजन व मार्गदर्शन.
२ दिवस प्राथमिक आरोग्य केंद्र भेट/रेकॉर्ड तपासणी.
२ दिवस उपकेंद्र तपासणे.
२ दिवस शिबीर आयोजन.
१ दिवस लसीकरण सत्र अवलोकन व मार्गदर्शन.
३ दिवस पुनर्पडताळणी/साथनियंत्रण/आवश्यक कामे.

याप्रमाणे एकूण १२ दिवस फिरती व ५ मुक्काम निश्चित केले आहेत.

आरोग्य सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने एखाद्या महिन्यात कार्यक्षेत्रात जादा दिवस फिरती करावी लागली तरी त्याचा वेगळा भत्ता अनुज्ञेय नाही. तथापि शासन निर्णय, दिनांक १९.१.९५ मधील परिच्छेद ३ मधील १ ते ५ अटीप्रमाणे पूर्तता आवश्यक राहील.

सदर पत्राची अंमलबजावणी उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ८.१.१९९५ पासून करावी.

सह संचालक, आरोग्य सेवा.
[आरोग्य] पुणे ४११ ००१.

प्रत सादर : संचालक, आरोग्य सेवा,
मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत सस्नेह : सह संचालक, आरोग्य सेवा [हिवताप व हत्तीरोग]
पुणे ६ यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत सस्नेह : स्वीय सहायक,
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
यांना दि. १६.१०.१९९५ रोजी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, सोलापूर यांचेशी झालेल्या चर्चेनुसार पुर्तता.

न्हेश्रे ७२२६

(८५३)

सार्वजनिक आरोग्य विभागातील व ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद/पंचायत समीतीतील फिरतीवर असणाऱ्या आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्ता मंजूर करणे बाबत.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र. एसआओ-१०९०/१४९१[६८/९०]सेवा-६, मंत्रालय, मुंबई-३२ दि-१९ जाने. १९९५

[१] शासन निर्णय वित्त विभाग क्र. टीआरए-१२६८/१००४/सीसीआर/एकेमन १८ दिनांक-२९ नोव्हेंबर १९६९

[२] शासन निर्णय वित्तविभाग, क्र. टीआरए-१२७१/७९५/सीआर/एस३ दि-१७ डिसें. १९७१

[३] शासन निर्णय नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक एसआओ-१०७०/७७४३/डी, दिनांक ५ जून १९७३

[४] शासन निर्णय नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक एमआओ-१६७३/३२८७२/७, दिनांक ८ ऑगस्ट १९७४

[५] शासन निर्णय वित्तविभाग क्र. टीआरए-१०७७/१५६/सी/एसईआर-५, दि-११ ऑगस्ट १९७७

[६] शासन निर्णय, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक एमआयएस-१८७८/२५३६/१३, दिनांक १२ सप्टेंबर १९८०

[७] शासन निर्णय नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक एमआयएस-१८८२/१५५८/पीएच-१३, दिनांक-३१ मे १९८२

[८] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमपीडब्ल्यू-१०८२/५८८३[१] सेवा-६ दिनांक- १२ सप्टेंबर १९८५

[९] शासन निर्णय वित्तविभाग क्र. आरपीएस-१२८८/५६८/सेवा१० दि-३ ऑक्टोबर १९८८

[१०] शासन पत्र ग्रामविकास विभाग क्र. डीएसआर-२४८६/प्र.क्र. ८९-१८ दि-१५ मार्च १९८९

शासन निर्णय:-

शासनाने दिनांक १ जानेवारी १९७० पासून कायम प्रवासभत्ता देण्याची पद्धती बंद केली होती. तथापि हिवताप व हत्तीरोग योजनेतील कर्मचाऱ्याबाबत अपवाद करण्यात येवून सदर कायम प्रवासभत्ता शासननिर्णय वित्तविभाग क्र. आरपीएस-१२८८/५६८/सेवा-१० दि-३-१०-१९८८ चा आदेश लागू होईपर्यंत चालू ठेवण्यात आला होता. शासनाने दि-३-१०-१९८८ च्या आदेशानुसार कायम प्रवासभत्त्याची पद्धती पूर्णतः बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेवून खुला प्रवासभत्ता सर्व कर्मचाऱ्यांना लागू केला होता. कायम फिरतीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम प्रवास भत्त्याऐवजी खुला प्रवासभत्ता मंजूर केल्यामुळे व या विभागातील अशा कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात असल्याने कर्मचाऱ्यांची प्रवासभत्त्याची देयके तयार करण्यास अपूऱ्या कर्मचारीवर्गामुळे बराच विलंब लागून अडचणी उद्भवत होत्या. त्यामुळे कायम प्रवासभत्त्याची पद्धत पुन्हा सुरु करण्याची मागणी आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या संघटना शासनाकडे सातत्याने करीत असत. कर्मचाऱ्यांना प्रवासभत्त्याची देयके वेळेत न मिळाल्याने न्यायालयीन प्रकरणेसुद्धा उद्भवली आहेत. या सर्व बाबींचा पूर्नविचार करुन आरोग्यसेवा विभागातील फिरतीचे काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवास भत्त्याऐवजी पुन्हा कायम प्रवास भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. सदर बाबींचा विचार होवून आरोग्यसेवा विभागातील फिरतीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार खुल्या प्रवासभत्त्याऐवजी कायम प्रवासभत्ता पुढे परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

.....२

पंचायत समिती एरंडोल
विभाग :-

| हुद्दा | मुख्यालय | कार्यक्षेत्र | कायम प्रवास भत्त्याची दरमहा रक्कम [रुपये] |
|---|---|---|---|
| [१] आरोग्य कर्मचारी [पुरुष/महिला] | उपविभाग उपकेंद्र | प्रा. आ. केंद्र | ३१५=०० |
| [२] आरोग्य सहाय्यक [पुरुष/महिला] | प्रा. आ. केंद्र | तालुका कार्यक्षेत्र | ५३०=०० |
| [३] कुष्ठरोग तंत्रज्ञ | प्रा. आ. केंद्र | तालुका कार्यक्षेत्र | ५३०=०० |
| [४][अ] वरिष्ठ क्षेत्र-कार्यकर्ता [कायम] | जिल्हा | जिल्हा कार्यक्षेत्र | ३१५=०० |
| [ब] वरिष्ठ क्षेत्रकार्यकर्ता [हंगामी] | जिल्हा | तालुका कार्यक्षेत्र | ३१५=०० |
| [५][अ] क्षेत्र कार्यकर्ता [कायम] | जिल्हा | जिल्हा कार्यक्षेत्र | ३१५=०० |
| [ब] क्षेत्र कार्यकर्ता [हंगामी] | तालुका | तालुका कार्यक्षेत्र | ३१५=०० |
| [६] आरोग्य पर्यवेक्षक/ विस्तार अधिकारी | पंचायत समिती [तालुका मुख्य] | तालुका कार्यक्षेत्र | ६००=०० |
| [७] अवैद्यकिय पर्यवेक्षक | कुष्ठरोग नियंत्रण कक्ष | तालुका कार्यक्षेत्र | ६[illegible]०=०० |
| [८] आरोग्य सहाय्यक [स्त्री/पुरुष] | जि. आ. कार्यालय | जिल्हा कार्यक्षेत्र | ५८२=०० |
| [९] अवैद्यकिय पर्यवेक्षक. | जि. आ. कार्यालय | जिल्हा कार्यक्षेत्र | ६६०=०० |
| [१०] आरोग्य पर्यवेक्षक/ विस्तार अधिकारी [आ.] | जि. आ. कार्यालय | जिल्हा कार्यक्षेत्र | ६६०=०० |
| [११] जिल्हा आरोग्य परि. | जि. आ. कार्यालय | जिल्हा कार्यक्षेत्र | ६६०=०० |

ज्या कर्मचाऱ्यांना व अराजपत्रित आरोग्य सेवेशी संबंधीत अधिकाऱ्यांना कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय आहे अशा कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या मासिक वेतनासोबत कायम प्रवास भत्त्याची रक्कम अदा करण्यात यावी.

३. कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय होण्याकरीता खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे :-

[१] संबंधीत पदधारकांनी त्यांना नेमून दिलेल्या फिरतीचे दिवसाइतकी फिरती प्रत्येक महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे.

[२] केलेल्या फिरतीच्या दिवसांचा आढावा दर तिन महिन्यांनी घ्यावा. ज्या महिन्यात त्यांनी केलेल्या दिवसांपेक्षा कमी फिरती असेल त्या महिन्याचा भत्ता अनुज्ञेय होणार नाही तथापि काही आकस्मीक परिस्थीत कर्मचाऱ्यांना नेमून दिलेल्या दिवसांच्या संख्येची पूर्तता करणे त्यास शक्य न झाल्यास विभाग प्रमुख संबंधीत कर्मचारी [illegible] आवाक्याबाहेरील कारणामुळे अशी पूर्तता करु शकला नाही अशी त्यांची खात्री झाल्यास ते अशा कर्मचाऱ्यांस त्या महिन्याची फिरतीच्या दिवसांच्या संख्येच्या प्रमाणात कायम प्रवासभत्ता मंजूर करु शकतील.

[३] कायम प्रवासभत्ता धारकांनी पुढील महिन्याचा [illegible] फिरती कार्यक्रम अगोदरच्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत खाते प्रमुखांना सादर करावा व त्याप्रमाणे फिरती करावी.

[४] उपरोक्त दैनंदिनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस सादर करावी व त्या दैनंदिनीस कार्यालय प्रमुखाची मान्यता मिळाल्याशिवाय पुढील महिन्याचा कायम प्रवास भत्ता अदा करु नये.

[५] फिरतीच्या दिवशी शासकिय वाहनाचा उपयोग केल्यास त्या दिवसाचा १/४ कायम प्रवास भत्ता कपात करावा.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ [सन १९६२चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. ५] मधील कलम २४८च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असा आदेश देत आहे की, उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेली जी पदे दि-१२-९-८५च्या आदेशात नमूद केलेली जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर असलेल्या पदांना व तत्सम जिल्हा परिषद परिचारिका कर्मचाऱ्यांना वरील आदेश योग्य त्या फेरफारा सह लागू करण्यात येत आहेत.

[५] प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च संबंधीत कार्यालयांनी त्यांचे योजनेतर शिर्षातंर्गत वेतनभत्ते बाबीतील प्रवासभत्ता/स्थानिक प्रवासभत्ता अंतर्गत मंजूर निधीतून करावा व वित्तीय वर्ष १९९४-९५च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदर आदेश दिनांक-१-१-१९९५पासून अंमलात येतील.

[६] सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रं. २१६/९४/सेवा-५ दि-११-११-१९९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

सही/- x x x
[ शं. शा. अपावकर ]
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव.

---

जा. नं. आरोग्य-आस्था-३-आरआर-४७२-९५
जळगांव दिनांक-२६-७-१९९५

प्रत,

[१] सर्व वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र
[२] सर्व गटविकास अधिकारी पंचायत समिती
[३] आरोग्य विभागातील लेखा १, २ व ४

उपरोक्त शासन निर्णयानुसार सर्व फिरस्ती आरोग्य कर्मचाऱ्यांना कायमप्रवास भत्ता दिनांक-१-१-१९९५ पासून लागू करणेत येवून फरकाची रक्कम माहे जुलै ९५ पेड इन ऑगष्ट ९५च्या वेतन देयकात काढणेत येवून पूर्तता अहवाल सादर करावा.

टिपणी मा. मु. का. अ. जि. प. जळगांव ]
यांनी मंजूर केली असे ]

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव करीता

प्रत- मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव.

प्रत- मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आरोग्य कर्मचारी संघटना शाखा, जळगांव.